UGC Approved
Refereed Journal
UGC
Jr.No.43053

ISSN 2394-5303

# Printing Area

International Multidisciplinary Research Journal
Issue-31, Vol-03, July 2017



Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

APPROVED

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad.Dist.Ratnagiri 415203

# Index

01) ATTITUDE OF TEACHERS TOWARDS CONTINUOUS & COMPERHENSIVE EVALUATION
**VIJENDER BHARTIYA, Rohtak** || 10

02) EMERGING TRENDS IN BANKING
**Dr. Jayant Prabhakar Bobde, Akola** || 16

03) Status of Women Entrepreneurs in 21st Century in India
**Dr. Devkate Balaji Narayan, Osmanabad [MS]** || 20

04) Influence of Celebrity Endorsement on Consumers : An Empirical Study
**Dr. Parul Goel, Delhi** || 22

05) Green Library : All Aspects Relating with Library
**Kulkarni Rahul Hanmant, Osmanabad** || 26

06) A STUDY ON WOMEN AND CHILD HAVING KNOWLEDGE ABOUT THE CONSTITUTIONAL ...
**HARIOM SINGH AHMANA, Gwalior (M.P.)** || 30

07) PRADHAN MANTRI MUDRA YOJANA (PMMY) : A NEW INSTITUTION FOR DEVELOPMENT ...
**Jitender kumar, Dr. D.P. Warne, Sirsa** || 34

08) Stress and Adolescents in the modern age
**Honorene H. Johnson, Pune** || 38

09) INCLUSIVE EDUCATION AND EDUCATION FOR ALL
**Ms. Monika Rani, Phagwara** || 42

10) Basidiomycetes Fungal Spore diversity over Sunflower field at Beed Dist
**Dr. Munde V. R., Parli-vaijnath** || 46

11) STUDENT ABSENTEEISM, CAUSE, AND IMPACT ON ACADEMIC ACHIEVEMENT : ...
**Dr. Geeta Pathak** || 49

12) TAX REFORMS IN INDIA—GST
**Pramila Devi, Haryana** || 55

13) Manju Kapoor's 'Chocolate' – A Rebellion Ignited
**Dr. Mukund L. Revadivala, Patan (Gujarat)** || 63

http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03



PRINCIPAL

14) Performance Appraisal: A strategy for Continuous Improvement and Assured Performance
**Dr. A. Jaya Kumar Shetty, Ujire** || 66

15) Influence of place of residence on Attitude of Teacher Trainees toward Semester System
**Dr. Pargat Singh Garcha, Gurusar Sadhar** || 71

16) Practices of Discrimination and Koragas of Kasaragod
**Vijaya Kumari.K, Kerala** || 75

17) Mahatma Phule and Cultivator's Whipcord
**Mr. Madhukar R Wankhede, Dhule** || 80

18) Social Conscience and Awareness Reflected in the Works of Mulk Raj Anand
**Mr. Sunil N. Wathore, Wardha** || 83

19) Grassroots Governance towards Consensus Oriented and Development ...
**Dr. Akhilesh Pal** || 88

20) Consumer protection in India
**Prof. Gajanan R. Jangamwar, Ramnagar, Wardha** || 97

21) Perception of School Teachers about Transactional Practices of Social Studies
**Dr. Pargat Singh Garcha, Gurusar Sadhar** || 102

22) श्रीचक्रधर स्वामी - आद्य समाज क्रांतीकारक
**श्री. कांबळे लहु बळीराम, अंबाजोगाई** || 107

23) साहित्यातील प्रयोगशीलता
**डॉ. गजानन अपिने, कोल्हापूर** || 110

24) भारतीय शास्त्रीय संगीतात पूर्णवादाचे स्थान
**प्रा. संगीता चाटी, नांदेड** || 116

25) महाराष्ट्रातील ई-प्रशासन : एक प्रशासकीय अभ्यास
**डॉ. सुनिल लक्ष्मण गावंडे, Nanded** || 119

26) विद्यार्थ्यांची उदयोजकता क्षमता व कौशल्य विकासात शिक्षणाची व संगणकाची भूमिका
**प्राचार्य डॉ. मनोहर तुकाराम पाटील, धुळे (महाराष्ट्र)** || 121

27) नाशिक शहराचे नागरीकरण व निवडक सामाजिक संस्थांचे योगदान
**मिलिंद राजेंद्र थोरात, जि. नाशिक** || 124



http://www.printingarea.blogspot.com | www.vidyawarta.com/03

PRINCIPAL
Lokneta Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College
Mandangad, Dist.Ratnagiri 415203

28) मराठी नियतकालिकांचे प्रबोधनातील योगदान
डॉ. भाऊसाहेब दादासाहेब गव्हाणे, जि.पुणे || 127

29) कृषी पर्यटन : ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा
डॉ. वाल्मिक दगडू परहर, जि. रत्नागिरी. || 130

30) नक्षलवादाची ५० वर्षे व भारताची अंतर्गत सुरक्षा
डॉ. बी. डी. तोडकर || 133

31) अठरा कारखाने व बारा महालांचे स्वराज्याच्या प्रशासनातील महत्व : एक ऐतिहासिक अध्ययन
कु. दुर्गा यावले, नागपूर || 140

32) भारतीय मध्यवर्ग का सांस्कृतिक विश्लेषण
महेन्द्र कुमार कुशवाहा, म.प्र. || 144

33) मन के डॉक्टर हैं संत !!!
डॉ. सुनील गुलाबसिंग जाधव, नांदेड || 148

34) विद्यासागर नौटियाल के साहित्य में उत्तराखण्ड का राजनैतिक स्वरूप
सविता मैठाणी, श्रीनगर गढ़वाल उत्तराखण्ड || 151

35) प्राथमिक तथा माध्यमिक विद्यालय में कार्यरत शिक्षकों द्वारा दृश्य—श्रव्य संचार माध्यमों का उपयोग
राजेश, डॉ. माधवीलता दुबे, भोपाल म.प्र. || 156

36) मीराबाई के काव्य में स्त्री—चेतना के स्वर
कृष्णा राणा, टिहरी गढ़वाल, उत्तराखण्ड || 159

37) बॉलीवुड फिल्में सामाजिक परिवर्तन व संस्कृति की लोकदूत
रेखा रानी, सिरसा || 162

38) पंचायतीय राज में महिलाओं की सहभागिता एवं जागरूकता की भूमिका का एक समाजशास्त्रीय ..
.कु. सरिता, अल्मोड़ा || 165

39) स्वरयोग : एक विवेचन
डॉ. नीलम श्रीवास्तव, अमरकंटक || 169

40) उपभोक्ता का अधिकार : एक विश्लेषणात्मक अध्ययन
डॉ. प्रभा वेरूलकर, धमतरी (छ.ग.) || 172

http://www.printingarea.blogspot.com www.vidyawarta.com/03



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science ...
... Dist. Ratnagiri ...

41) हिन्दी उपन्यास साहित्य में महानगरीय बोध (१९९०–२०१०)
**धर्मेन्द्र कुमार सिंह, चित्रकूट सतना (म.प्र.)** || 174

42) यौगिक ग्रन्थो में त्राटक क्रिया – एक अनुशीलन
**डॉ. संदीप ठाकरे, अमरकंटक म.प्र.** || 177

43) भारत–चीन संबंध : बदलता परिदृश्य
**डॉ. दीपेन्द्र सिंह तोपवाल, नई टिहरी, टि.ग.** || 179

44) अज्ञेय की शाश्वती
**डॉ. प्रेरणा उबाळे, पुणे** || 183

45) भारतीय वाद्यों में पार्श्व तन्त्रियों की उत्पत्ति, विकास एवम् व्यवस्था
**लयोत्तमा उप्रेती, दिल्ली** || 186

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Harshwardhan Publication Pvt.Ltd. • International Multilingual Research Journal • University Grant Commission APPROVED

PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts,Commerce & Science College
Mandangad,Dist.Ratnagiri.415203

29

# कृषी पर्यटन : ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा

डॉ. वाल्मिक दगडू परहर
सहाय्यक प्राध्यापक (अर्थशास्त्र विभाग)
लोकनेते गोपीनाथजी मुंडे कला, वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.

**********

भारत हा कृषी प्रधान देश असून कृषी क्षेत्र हे अर्थव्यवस्थेचा आत्मा मानला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेत उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन, राष्ट्रीय उत्पन्नातील हिस्सा, कच्या मालाचे प्रमुख केंद्र, परकीय चलन प्राप्ती, व्यापार वृध्दी, विविध क्षेत्रास सहाय्यक क्षेत्र, सरकारच्या महसूलाचे साधन अशा अनेक कारणांनी कृषी क्षेत्रास महत्त्वाचे स्थान असले तरी भारतीय अर्थव्यवस्थेचे ग्रामीण अर्थव्यवस्था आणि शहरी अर्थव्यवस्था असा दोन गटात विभागणी झालेली आहे. शहरी अर्थव्यवस्थेच्या तुलनेत ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाचा दर अत्यंत कमी आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील कृषी हा प्रमुख व्यवसाय असून कृषी क्षेत्राला भेडसावणाऱ्या विभिन्न समस्या, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा अभाव, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा, सातत्याने निर्माण होणारी दुष्काळी परिस्थिती, भांडवलाचा अभाव, आधुनिक तंत्रज्ञानांचा अभाव व रोजगार निर्मीतीचा दर अल्प असे त्यास अनेक घटक कारणीभूत असलेले दिसून येतात.

ग्रामीण भागाच्या विकासासाठी कृषी क्षेत्राचा शाश्वत विकास आणि रोजगाराची संधी निर्माण करणे गरजेचे असून शेती हे केवळ उदरनिर्वाहाच्या साधनाऐवजी विकासाचे साधन मानले गेले पाहिजे. ग्रामीण भागाच्या विकासासाठी शेतीला पुरक व्यवसायांची जोड देणे आवश्यक आहे. अशा पुरक व्यवसायांपैकी कृषी पर्यटन हा एक महत्त्वाचा जोड व्यवसाय आहे. कृषी पर्यटन या व्यवसायाची जोड व्यवसाय म्हणून ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

- **कृषी पर्यटनाची संकल्पना**

कृषी पर्यटनाची सुरुवात प्रथम रोमन कालखंडात झालेली दिसून येते. कृषी पर्यटनाचा इतिहास हा १८ व्या शतकापूर्वीचा आहे. आठवडा अखेर सुट्टी, दीर्घ सुट्टी, ग्रामीण भागातील शेतीसंबंधित राहणीमानाचा अनुभव, शहरी मानवाचे अत्यंत धावपळीचे जीवन, शेतीला पुरक जोड व्यवसाय आणि मनोरंजन या हेतूने कृषी पर्यटनाचा उगम झालेला दिसून येतो. अमेरिका या देशात १८०० व्या शतकात कृषी पर्यटनाची सुरुवात झाली. परंतु त्यावेळी हे पर्यटन फारसे लोकप्रिय नव्हते. कारण वाहतूक व दळणवळण साधनांची कमतरता होय. १९२० नंतर वाहतूक व दळणवळण सुविधा वाढीमुळे पर्यटन वाढीस मदत झाली. इटलीमध्ये १९५० ते १९७० च्या दशकात अल्पभूधारक शेतकऱ्यांना शेतीमध्ये तोटा होत असल्याने शेती कसण्याऐवजी इतरत्र रोजगार शोधण्याचा प्रयत्न केला. १९७१ मध्ये लंडन शहरात शनिवार आणि रविवार या वीकएंडमध्ये कृषी पर्यटन आयोजित केले. अमेरिकेत १९८० ते १९९० च्या दरम्यान व्यावसायिक सहलीची प्रथा सुरु झाली. इटलीमध्ये १९८५ मध्ये कृषी पर्यटनाचा कायदा समंत करून शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यात आले. ऑस्ट्रेलिया देशात १९६५ मध्ये कृषी पर्यटनास सुरुवात झाली.

भारतामध्ये सन १९८५–९० या सातव्या पंचवार्षिक योजनेच्या काळात पर्यटन क्षेत्रास उद्योगाचा दर्जा दिला. त्यामुळे पर्यटन व्यवसायाच्या विकासास गती मिळाली. सन २००० पासून कृषी पर्यटन केंद्र या संकल्पनेवर आधारित पर्यटन केंद्र स्थापन झाली. सुरुवातीस केवळ ०२ केंद्र होती मात्र २०१० ते २०१४ या काळात १३६ कृषी पर्यटन केंद्र सरू झाली. महाराष्ट्र राज्य हे देशातील कृषी पर्यटन सुरू करणारे महत्त्वाचे राज्य आहे. १६ मे २००४ साली पुणे जिल्हयातील बारामती येथून कृषी पर्यटनास सुरुवात करण्यात आली. सन २००५ मध्ये श्री. पांडूरंग तावरे यांनी ॲग्रो टुरिझम डेव्हलमेंट कार्पोरेशन (A.T.D.C) ची



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts Commerce & Science College
Mandangad, Dist. Ratnagiri

स्थापना केली. १२ डिसेंबर २००८ मध्ये तात्कालिन केंद्रीय कृषी मंत्री मा. शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य कृषी आणि ग्रामीण पर्यटन सहकारी महासंघ (मार्ट) ची स्थापना करण्यात आली. कृषी पर्यटनास चालना मिळावी म्हणून २०११ हे वर्ष कृषी पर्यटन वर्ष म्हणून घोषित केलेले असून १६ मे हा जागतिक कृषी पर्यटन दिवस म्हणून घोषित केला आहे.

कृषी भूषण श्री. चंद्रशेखर भडसावळे यांना महाराष्ट्रातील कृषी पर्यटनाचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्या मते ''स्वत: शेतकऱ्याने आपल्या खेडयातील फळत्या, फुलत्या शेतीवरच आयोजित केलेली आनंदायी शिक्षण प्रक्रिया व मौज यांचा सहज सुंदर मिलाफ असलेला उपक्रम म्हणजे कृषी पर्यटन होय.''

कृषी पर्यटन म्हणजे शेतीवरील फेरफटका कि जे ग्रामीण भागातील संस्कृतीची ओळख, ग्रामीण जीवनाची प्रचीती, शिक्षण, प्रशिक्षण, निसर्गाच्या सानिध्यातील जीवनाचा आनंद, शहरी जीवनशैलीपासून दुर मात्र शांत, निवांत, अल्हाददायक शेती जीवन आणि शेतीला पुरक जोड व्यवसाय परंतु शेतकऱ्यांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीचे साधन आहे.

- **ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा**

कृषी पर्यटन उद्योग इतर उद्योगांपेक्षा आगळा वेगळा उपक्रम आहे. या पर्यटनात ग्रामीण जीवनाचा अनुभव, ग्रामीण संस्कृतीची ओळख, शिक्षण, प्रशिक्षण त्याचबरोबर ग्रामीण रूढी परंपरा, चालीरिती, पीक पाणी, प्राणी, पक्षी, निसर्गाचे सानिध्य, कुटुंब व्यवस्था या सर्वांचा अनुभव आणि सहभाग मिळतो. कृषी पर्यटन हा ग्रामीण अर्थवयावस्थेचा आधारस्तंभ आहे.

रोजगार निर्मीती व बेरोजगारीवर मात

कृषी पर्यटन ग्रामीण अर्थव्यवस्थेतील शेतीला पर्यायी व पुरक रोजगाराचे साधन आहे. कृषी क्षेत्रातील अनियमिततेमुळे छुप्या बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. बेरोजगारी ही विकासातील मोठा अडसर आहे. ग्रामीण भागात कृषी पर्यटनाला वाव मिळाला तर मोठया प्रमाणात पर्यायी व पुरक रोजगाराची नवीन संधी उपलब्ध होते.

**बकाल खेडी व स्थलांतरास पर्याय**

कृषी पर्यटनातून बकाल खेडयांचा प्रश्न सुटतो. कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेमुळे ग्रामीण भागातील लोक रोजगारासाठी शहरी भागात स्थलांतरीत होताना दिसून येतात. त्यातून एकीकडे शहरीकरणात वाढ तर दुसरीकडे बकाल खेडयांची समस्या निर्माण होते. असे दोन्ही प्रश्न सोडविण्यासाठी कृषी पर्यटन महत्त्वाचे आहे.

**पायाभूत सुविधांचा विस्तार**

कृषी पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात पायाभूत सुविधांचा मोठया प्रमाणात विस्तार होत असताना दिसून येतो. पर्यटनासाठी वाहतूक, दळणवळण सुविधा तर अन्य पायाभूत सुविधांमध्ये वाढ होते. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासास चालना मिळते.

**कृषी विकासास सहाय्य**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा शेती हा आत्मा आहे. बहुसंख्य लोकांच्या उपजीविकचे मुख्य स्त्रोत म्हणजे शेती होय. कृषी क्षेत्रातील अनिश्चिततेमुळे कृषी क्षेत्राच्या विकासात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. कृषी पर्यटन हा कृषी क्षेत्रात पुरक उद्योग आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानाचा स्तर उचावून कृषी क्षेत्रातील गुंतवणूक प्रमाण मोठया प्रमाणात वाढत आहे.

**विदेशी चलन प्राप्ती**

पर्यटन हा एक आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटकांना विविध सेवा पैशाच्या मोबदल्यात दिल्या जातात. विविध देशातून आपल्या देशात पर्यटक येत असतात. त्यामुळे परकिय चलन प्राप्त होते. हे परकिय चलन देशाच्या आर्थिक विकासास उपयूक्त असते.

कृषी मालाला स्थानिक बाजारपेठ

कृषी पर्यटनातून शेतमालाला स्थानिक बाजारपेठ उपलब्ध होते. पर्यटक स्थानिक बाजारातून आपणास आवश्यक वस्तू वाजवी किंमतीस खरेदी करतात. तसेच कृषी पर्यटनातून शेतमाल बाजारपेठे सोबत अन्य बाजारपेठांचा विस्तार होत असतो. पर्यटन ठिकाणी येणारे प्रवासी व पर्यटक वेगवेगळया बाजारातून फिरत असताना वस्तूची खरेदी करतात. त्यामुळे बाजारपेठांचा विकास होतो. हा बाजारपेठांचा विकास आर्थिकदृष्टया महत्त्वाचा घटक आहे.



PRINCIPAL
Loknete Gopinathji Munde
Arts, Commerce & Science College

**आर्थिक विषमता व प्रादेशिक असमतोल दूर करण्यास मदत**

शहरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील दरी म्हणजे उत्पन्न विषमता होय. शहरी अर्थव्यवस्थेच्या तुलनेत ग्रामीण अर्थव्यवस्थेतील उत्पन्नातील तफावत फार मोठी आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी कृषी पर्यटन उपयूक्त ठरते. तसेच कृषी पर्यटनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग हा प्रदेशा—प्रदेशांच्या विकासातील असमतोल दूर करण्यास मदत होते.

**व्यवसाय व सेवांच्या विकास सहाय्यक**

ग्रामीण भागात कृषी पर्यटनातून अन्य संलग्न व्यवसायांच्या विकासास चालना मिळते. उदा. निवास गृहे, हॉटेल, हस्तकला, मनेरंजन केंद्र, स्थानिक वस्तू उत्पादने तसेच बॅंका, विमा सेवा, वाहतूक व दळणवळण, शिक्षण, आरोग्य अशा अनेक व्यवसाय व सेवांच्या उगमाचे स्त्रोत कृषी पर्यटन आहे.

**ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासास मदत**

कृषी पर्यटन हा एक महत्त्वाचा उद्योग आहे. या उद्योगांमुळे ग्रामीण भागात जलद आर्थिक विकासास मदत होते. कृषी पर्यटनातून ग्रामीण भागातील विविध क्षेत्रांमध्ये मोठया प्रमाणात भांडवलाची गुंतवणूक केली जाते. त्यातून लोकांना रोजगार मिळतो. शिवाय नानविध व्यवसाय व सेवांचा विकास होतो. एकंदरीत ग्रामीण भागातील लोकांचा आर्थिक स्तर बदलतो. कि ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाला पोषक वातावरण तयार होते.

कृषी पर्यटन हा एक महत्त्वाचा व्यवसाय आहे. शेतीमध्ये नैसर्गिक पर्यटनास भरपूर वाव आहे. कृषी पर्यटनातून शेतकरी शेतीची पांरपारिक पध्दतीचा त्याग करून आधुनिकतेकडे झुकलेले दिसून येतात. कृषी पर्यटन ही एक आर्थिक क्रिया असून पर्यटनातून मोठया प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण होत असते. पर्यटन ही विविधता असणारी प्रक्रिया असून कृषी पर्यटनातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन घडून येते. ग्रामीण भागाच्या जडणघडणीमध्ये पर्यटन व्यवसाय अन्यनसाधारण स्थान आहे. कृषी पर्यटन हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ असून ग्रामीण भागाचा आरसा म्हणून कृषी पर्यटन महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय शेती असून शेती व तत्सम व्यवसायांच्या विकासाकरिता म्हणजे अर्थव्यवस्था बलशाली बनविण्यासाठी कृषी पर्यटन आवश्यक आहे. शेतकऱ्यांचा सामाजिक, आर्थिक दर्जा सुधारण्यास कृषी पर्यटन उपयूक्त आहे. कृषी पर्यटन हे ग्रामीण भागातील रोजगार निर्मीतीचे नवीन दालन असून आर्थिक विकासाचे प्रमुख केंद्र आहे.

**संदर्भ सूची**


१) एस. व्ही. कुलकर्णी, महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगातील संधी, उद्योजक, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र.

२) पांडूरंग तावरे, कृषी आणि पर्यटन मार्गदर्शिका, कृषी पर्यटन विकास संस्था, बारामती, २०१६.

३) डॉ. अंकूश आहेर, प्रा. डी. एम. मारकड, पर्यटन भूगोल, पायल पब्लिकेशन, पुणे, २०१५

४) डॉ. एल. एच. पाटील, कृषी पर्यटन, मयूर प्रकाशन, लातूर, २०१३.

५) डॉ. एस. बी. शिंदे, पर्यटन भूगोल, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१.

६) अर्थसंवाद, खंड ३६, अंक १, एप्रिल—जून २०१२.

७) अर्थसंवाद, खंड ४०, अंक ४, जानेवारी—मार्च २०१७.


❑❑❑



PRINCIPAL